**STD : IXth** **SUBMISSION DATE : 17.09.2017** **MARKS : 100**

**SUB : MARATHI** **MODEL QUESTION PAPER** **TIME – 3 HOURS.**

**प्र.१ अ) खालील दिलेल्या उताऱ्यावरून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** (०८)

**अ) गुणवैशिष्ठे लिहा.** (२)




सखू आजी गावातल्या कुणाच्याही बारशाला, लग्नाला, मयताला हटकून पुढं असायचीच. सगळं तिच्या म्हणण्यानुसार चालायचं. तिच्या शब्दाला चॅलेंज नसायचं. गावातल्या बापय माणसांत ती एकदम बरोबरीनं वावरायची. एकदा गावच्या लक्ष्मीची जत्रा ठरली. इडं पडलं. चाकबंदी झाली. अशात गावातली वस्तू बाहेर जाऊ द्यायची नाही, असा नियम. अशात सातबा घोरपड्याचा पोरगा वावगं वागला. गावबैठक बसली. पंच म्हणाले,'रिवाजानुसार सातबाच्या पोराला दंड कराच.' सगळ्यांनी माना डोलावल्या. निर्णय फायनल. एवढ्यात म्हातारी उठली. म्हणाली, पोरगं मांडीवर घाण करतंय म्हणून मांडी कापता व्हयगाऽऽ ?'सगळे टाळा पगळून बघाय लागले. बोलायचं काय? शेवटी सगळे उठले. आपापल्या घराच्या वाटेला लागले. सातबाच्या पोराला कोणीच काही बोललं नाही. म्हातारीची गावाला भीती होती.

**ब) चौकट पूर्ण करा.** (२)




**क) व्याकरण :** (२)

१) सातबाच्या, मयताला (विभक्ती सोडवा.)

२) उताऱ्यातील दोन अव्यय ओळखा व त्याची नावे लिहा.

**ड) सखू आजीविषयी तुमचे मत लिहा.** (२)

**प्र.१ ब) खालील दिलेल्या उताऱ्यावरून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** (०८)

**अ) आकृती पूर्ण करा.**

१) (२)




ऑलिपिंक गावाकडे आमची मोटार भरधाव वेगाने जात होती. गर्दी प्रचंड असली तरी रहदारीला अडचण मुळीच नव्हती. येण्याजाण्यासाठी वेगवेगळे रस्ते होत. खेळांचे मैदान जवळ येऊ लागले, तसे आमचे डोळे समोरील क्षितिजाकडे लागले. खूपच उंच अशा स्तंभावर एक भलामोठा ध्वज फडफडत असलेला आम्हांला दिसला. ऑलिंपिक सामन्यांचे ते स्वतंत्र निशाण होते. ध्वजावरील पांढऱ्याशुभ्र पार्श्वभूमीवर लाल, पिवळ्या, निळ्या, हिरव्या व काळ्या रंगांची वर्तुळे एकमेकांत गुंफलेली होती. जणू पाच मित्रच हातांत हात घालून आपल्या मैत्रीची साक्ष जगाला देत होते ! ही पाच वर्तुळे म्हणजे जगातील पाच खंड आणि त्यांची शुभ्रधवल पार्श्वभूमी म्हणजे विशाल अंतराळ. या ध्वजावर ऑलिंपिकचे ब्रीदवाक्य लिहिलेले आहे-'सिटियस, ऑल्टियस, फॉर्टियस. ' म्हणजे गतिमानता, उच्चता, तेजस्विता. प्रत्येक खेळाडूने जास्तीत जास्त गतिमान होण्याचा प्रयत्न केला पाहिजे; अधिकाधिक उंची गाठण्याची शिकस्त केली पाहिजे आणि बलसंवर्धनासाठी जास्तीत जास्त श्रम केले पाहिजेत, असा संदेश हा ध्वज खेळाडूंना देत असतो. या ध्वजस्तंभाजवळ एक स्फूर्तिदायक मशाल सतत तेवत असते. ऑलिंपिक सामने म्हणजे क्रीडापटूंसाठी आणि क्रीडाशौकिनांसाठी एक पर्वणीच असते. पृथ्वीच्या पाठीवरील सर्व राष्ट्रांतील सुमारे पाच ते सहा हजार खेळाडू या सामन्यांमध्ये भाग घेतात. स्त्री - खेळाडूंचीही संख्या दोन हजारांच्या आसपास असते. प्रेक्षागारात सुमारे सत्तर ते ऐंशी हजार प्रेक्षक बसण्याची सोय असते. याशिवाय सुमारे पंचवीस हजार लोकांना हे सामने उभे राहून पाहता येतात. पोहण्याच्या शर्यतीसाठी चार - पाच तलावही बांधले आहेत.

२) **चौकट पूर्ण करा.** (२)

| | | |
|---|---|---|
| | वर्तुळाचे पाच रंग | |
| | | |

ब) **एका वाक्यात उत्तरे लिहा :** (२)

१) ऑलिंपिक सामन्यात सहभागी होणाऱ्या खेळाडूंची संख्या.

२) ऑलिंपिक ध्वजाचा व वर्तुळाचा कोणता अर्थ सांगितला आहे ?

क) **खेळ महत्वाचा का आहे ?** (२)

**प्र.१ क) खालील दिलेल्या उताऱ्यावरुन खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** (०८)

अ) **आकृतीबंध पूर्ण करा.** (२)

(१) छापखान्यातील दोन जर्मन तज्ज्ञ ☐

(१) ☐ (२) ☐

(२) रंगशाळेत रविवर्म्यांकडे स्वामींकडे ही भावना व इच्छा व्यक्त केली - (२)

थोड्याच वेळात केशरी दुधाचे पेले घेऊन चेतू आला. हसतमुखानं स्वामीजींनी तो पेला स्वीकारला. ते म्हणाले,

"कोच्चू, मला तुमचा छापखाना आणि रंगशाळासुध्दा पाहायची आहे."

रविवर्मा म्हणाला, "चलावं स्वामीजी!"

स्वामीजींच्यासह सारे छापखान्याच्या जागी आले. रविवर्म्यानं स्लायसर, गेहर्ट वगैरे जर्मन तज्ज्ञांची ओळख करुन दिली. स्वामीजी छापखान्याची सर्व व्यवस्था बारकाईनं बघत होते. ती पाहून ते रंगशाळेकडे निघाले. माडीवरच्या रंगशाळेत रविवर्म्यानं त्यांना आराम खुर्चीवर बसवलं. रंगशाळेतल्या चित्रसोपानावर कोरा फलक होता. रविवर्मा म्हणाला,

"स्वामीजी, माझ्या सुदैवानं आपला लाभ या रंगशाळेला झालेला आहे. आपली आज्ञा असेल तर आपलं चित्र काढण्याची अनुमती मिळावी."

स्वामीजी हसले. ते म्हणाले,

"आपण जरुर रेखाटा. त्याला माझी ना नाही. किंबहुना मी तो माझा सन्मान समजतो. तुम्ही आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार. तुमच्या हातून माझ्यासारख्या एका संन्याशाचं चित्र रेखाटलं गेलं. तर मला अभिमान वाटेल."

विवेकानंद ज्या वेळी निरोप घेत होते, त्या वेळी रविवर्म्याचं मन भरुन आलं होतं.

रविवर्मा विवेकानंदांच्या पाठोपाठ चालत होता. दाराशी पांढऱ्याशुभ्र चार घोड्यांची गाडी जुंपली होती. स्वामीजी आपल्या शिष्यांसह त्या बग्गीमध्ये बसले. रविवर्म्यानं त्यांच्या पायांवर मस्तक ठेवलं. स्वामीजी उद्‌गारले,

"विजयी भव!"

गाडी बंगल्याच्या आवारातून दूर जात होती. पण रविवर्म्याच्या मनातून त्या एक दिवसाच्या सहवासातल्या स्मृती कुठंतरी गुरफटल्या होत्या.

आजवरच्या आयुष्यातला त्याचा तो मोठा आनंदाचा क्षण होता.

ब) **साखळी पूर्ण करा :** (२)

(१) रंगशाळेतल्या चित्रसोपानावर हा होता → ☐

(२) स्वामीजींनी रविवर्म्याला हा आशीर्वाद दिला → ☐

क) **पुढील वाक्प्रचारांचा योग्य अर्थ निवडा :** (१)

(१) बारकाईने बघणे ☐

(१) लक्षपूर्वक पाहणे (२) कानाडोळा करणे (३) दुर्लक्ष करणे (४) जबाबदारी स्वीकारणे

(२) निरोप घेणे ☐

(१) येणे (२) जाणे (३) चालणे (४) बसणे

**ड) पुढील शब्दसमूहांबद्दल एक शब्द लिहा :** (१)

(१) सतत हसरा चेहऱ्याचा - ☐

(२) विदेशाशी जोडलेले - ☐

**प्र.२ अ) खालील दिलेल्या कवितेनुसार प्रश्नांची उत्तरे लिहा.** (१०)

**अ) आकृती पूर्ण करा.**

१) (२)




संतकृपा झाली ।
इमारत फळा आली ।।१।।
ज्ञानदेवें रचिला पाया ।
उभारिलें देवालया ।।२।।
नामा तयाचा किंकर ।
तेणें रचिलें तें आवार ।।३।।
जनार्दन एकनाथ ।
खांब दिधला भागवत ।।४।।
तुका झालासे कळस ।
भजन करा सावकाश ।।५।।
बहिणी म्हणे फडकती ध्वजा ।
निरुपणा केलें बोजा ।।६।।

२) (२)




**ब) संकल्पना स्पष्ट करा.** (२)

१) पाया रचणे - ☐ २) कळस चढ़वणे ☐

**क) कवितेतील समानार्थी शब्द शोधा.** (१)

१) झेंडा २) परिसर

**ड) एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)

इमारत कशाला म्हटले आहे ?

**इ) भावार्थ लिहा.** 'ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया।। (२)

**प्र.२ ब) खालील पैकी कोणत्याही एका कवितेचा खालील दिलेल्या मुद्यांच्या आधारे रसग्रहण करा.** (१०)

१) भेटीलागी जीवा २) व्यायामाचे महत्व

१) कवीचे नाम (१)
२) कवीचा जन्म (१)
३) कवितेची प्रस्तावना (१)
४) कवितेतील आवडलेली ओळ व भावार्थ (२)
५) कवितेतून मिळणारा संदेश (२)
६) कवीच्या दोन रचना (१)
७) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे (२)

**प्र.३ खालील पैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा.** (०६)

**अ) टिपा लिहा. (कोणतेही एक)**

१) एकशिंगी गेंडा २) गायबगळे

**ब) 'लहान मुलांची हास्यचित्रे काढणे अवघड आहे' याबाबत तुमचे मत लिहा.**

**क) व्यंगचित्राची वैशिष्ट्ये लिहा.**

**प्र.४ अ) व्याकरण विभाग :** (२०)

**१) सूचनेप्रमाणे लिहा.**

१) समासाचा विग्रह करुन समासाचा प्रकार ओळखा. (४)

(१) बरेवाईट (२) पाचपंधरा (३) म्हातारेकोतारे (४) मातापिता

**२) अलंकार.** (२)

१) विमान पक्ष्यासारखे गगनात गरगर फिरते.

२) मेघासारखा तो श्याम सावळा

(उपमेय, उपमान, समानधर्म, साम्यवाचक शब्द ओळखा)

**३) अलंकार ओळखा.** (२)

१) आंबा जणू काही साखरच वाटते.

२) नदीचे पाणी दूधासमान शुभ्र दिसते.

**४) योग्य विरामचिन्हे घालून पुढील वाक्य पुन्हा लिहा.** (२)

१) कोणी सहज म्हटलं आजी कुठं चाललीस

२) अरे तुझा पत्ता तरी काय

**ब) व्याकरण विभाग :** (२)

**१)**

| अ.क्र. | शब्द | मूळ शब्द | शब्दजात | लिंग | वचन | विभक्ती | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | पुरुषांसाठी | | | | | | |
| २) | होतात | | | | | | |

**२)** आजी माझ्या <u>जवळची</u> होती. **(अधोरेखित शब्दाचा विरुध्दार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा.)** (१)

**३)** याबाबत मला काहीही म्हणायचे नाही. **(काळ ओळखा)** (१)

**४)** पोरके होणे . **(योग्य अर्थाचा पर्याय निवडा)** (१)

**१)** अनाथ होणे **(२)** परकेपणा येणे **(३)** परदेशी जाणे

**५) अचूक शब्द ओळखा.** (१)

१) अस्तीत्व, अस्तित्व, अस्तित्व, अस्तीत्व

**६) शब्दसमूहासाठी योग्य शब्द लिहा.** (१)

पूर्वीच्या रुढ़ झालेल्या सुरसकथा

**७) चार अर्थपूर्ण शब्द लिहा.** (१)

सरपंच

**८) सामासिक शब्द तयार करा.** (१)

सूर्याचा उदय - ______

**९) समानार्थी लिहा.** (१)

१) रिवाज २) प्रखर

**प्र.५ अ) पुढील कृती सोडवा.** **(१५)**

**१) पत्र लेखन:- खालील जाहिरात वाचा आणि सूचनेनुसार पत्रलेखन करा.** **(५)**

**विज्ञान प्रयोगशाळेतील साहित्य व उपकरणांसाठी**
**एकच विश्वसनीय नाव**
**बिटल सायंटिफिक कंपनी**

- उत्तम दर्जा
- वाजवी दर
- १९६० पासून प्रसिध्द

अधिक माहितीसाठी लॉग इन करा : www. bitelsc. in
संपर्क : बिटल सायंटिफिक कंपनी, महाल, नागपूर - ४४००३२
भ्रमण ध्वनी : ९८९८२४५२३१

तुमच्या शाळेच्या प्रयोगशाळेसाठी साहित्य मागवणारे पत्र कंपनीला लिहा.

**किंवा**

तुमच्या शाळेच्या कंपनीकडून मागवलेल्या साहित्यातील त्रुटीविषयी तक्रार करणारे पत्र लिहा.

**२) कथा लेखन:-** **(५)**

**मुद्दे :** कोल्हा व करकोचा मैत्री - कोल्हयाने करकोच्याला जेवायला बोलावणे - उथळ थाळीत खीर देणे - करकोच्याला खीर खातर न येणे - करकोचा उपाशी - करकोच्याने कोल्हयाला जेवायला बोलावणे - सुरईत खीर देणे - कोल्हा उपाशी - तात्पर्य.

**३) आकलन लेखन:-** **(५)**

**खालील उतारा वाचून त्यावर पाच प्रश्न असे तयार करा की ज्याची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात येतील.**

ईश्वर आणि माणूस यांचे नाते माय - लेकरांसारखे असते. आई कधी आपल्या मुलाला उपाशी ठेवून स्वतः तूप - रोटी खाईल का? देवालादेखील आपला भक्त उपाशी असताना तूप कसे गोड लागेल? खरेतर ईश्वराला तूप, नैवेद्य, पूजा - अर्चा या अवडंबराची अजिबात गरज नसते. तो फक्त भावाचा भुकेला असतो. असे असताना भारतासारख्या गरीब देशात, जिथे लाखो लोकांना पोटाला अन्न मिळत नाही, तिथे देवाधर्मावर, उत्सवांवर चालणारी वारेमाप उधळपट्टी कितपत योग्य आहे?

आदिवासी भागात दरवर्षी हजारो मुले कुपोषणाने तडफडून मरत असताना आपण देवभक्तीने अवडंबर माजवत हजारो लिटर दूध अभिषेकापायी वाया घालवणे तुमच्या मनाला कितपत मानवते?

\- साने गुरुजी

**प्र.५ ब) खालील पैकी कोणतेही दोन कृती सोडवा.** **(१०)**

**१) जाहिरात लेखन :- पुढील जाहिरात पाहून त्याखालील कृती करा.**

**निशिगंध**
**टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स**

निशिगंधसह पाहा भारत, ते ही परवडणाऱ्या दरात !

**पॅकेज टूर्स**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| नैनीताल<br>कौसानी<br>मसुरी | शिमला<br>कुलू<br>मनाली | अमृतसर<br>मनाली | गंगटोक<br>सिक्कीम | केरळ | राजस्थान |

- उत्तम नियोजित सहली
- पूर्णवेळ मार्गदर्शक
- ३ तारांकित हॉटेल्समध्ये निवास
- ट्रॅव्हल्सतर्फे पूर्णवेळ शेफ

संपर्क : ०२२ - ५१३२०१७/१८/१९

२ दिवसांत नोंदणी केल्यास २५% पर्यंत सूट !

**१) आकृतिबंध पूर्ण करा.** **(२)**




**२) आकृतिबंध पूर्ण करा.** **(२)**




**३) निशिगंध ट्रॅव्हल्सतर्फे कोणती विशेष सवलत दिली आहे?** **(१)**

**२) संवाद लेखन :-** **(५)**

**'दहावीची पूर्वतयारी ' या विषयावर विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील संवाद लेखन करा.**

**३) वृत्तांत लेखन :-** **(५)**

**तुमच्या विद्यालयात साजऱ्या केलेल्या खालील विनविशेषाचा वृत्तांत लिहा.**

शिक्षकदिन समारोह
दि. ५ सप्टेंबर
लाल बहादुर शास्त्री विद्यालय, परळ
मार्गदर्शन : मुख्याध्यापिका
सौ. आचरेकर मॅडम



**प्र.५ क) निबंध लेखन :- (कोणतेही एक)** **(०५)**

१) माझे आवडते शिक्षक  २) परीक्षा नसत्या तर ....

*** BEST OF LUCK ***

STD : IXth | SUBMISSION DATE : 17.09.2017 | MARKS : 100

SUB : MARATHI | MODEL QUESTION PAPER SOLUTION | TIME – 3 HOUR.

**प्र.१अ) खालील दिलेल्या उताऱ्यावरून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** (०८)

**अ) गुणवैशिष्ठे लिहा.** (२)




**उत्तर :** १) प्रचंड बुध्दी (२) प्रचंड भाषिक ज्ञान (३) गावाबद्दल प्रेम (४) कार्यक्रमात पुढाकार

**ब) चौकट पूर्ण करा.** (२)




**उत्तर :** १) लग्न २) बारसे ३) मयताला

**क) व्याकरण :** (२)

**१) सातबाच्या, मयताला (विभक्ती सोडवा.)**

**उत्तर :** **च्या** - षष्टी एकवचन. **ला** - द्वितीया (चतुर्थी) एकवचन.

**२) उताऱ्यातील दोन अव्यय ओळखा व त्याची नावे लिहा.**

**उत्तर :** **रिवाजानुसार** - शब्दयोगी . **म्हणून** - उभयान्वयी.

**ड) सखू आजीविषयी तुमचे मत लिहा.** (२)

**उत्तर :** लेखक 'राजन गवस ' यांनी आपल्या पाठात रंगवलेली 'सखू आजी ' मनाला भावते. साधारण एखादया म्हाताऱ्या बाई सारखीच ती होती. तिचे वय नव्वद वर्षे होते. कमरेत वाकलेली आणि आधारासाठी हातात नेहमी काठी असायची. सुरकुत्यांनी भरलेला चेहरा नेहमी प्रसन्न दियासचा. गावातल्या प्रत्येकाशी तिने प्रेमाचं नातं जोडलेलं असे. जाता - येता ती प्रत्येकाशी बोलायची. तिच्याशी बोलताना प्रत्येकाला आनंद व्हायचा. ती नेहमी कवितेतूनच बोलायची. तिची कवितारुपी भाषा बोलणे सगळ्यांना समजायचेच असे नव्हते, पण प्रत्येकजण तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करायचा. लहान मुलांना जमवून त्यांना चित्रविचित्र गोष्टी सांगणे तिला खूप आवडायचे. शब्द शब्द जोडून कोणतीही कहाणी ती सांगायची. अशी ही आजी प्रगतशील दृष्टीची होती. त्यामुळेच स्वत:सोबत गावातील अनेक अडाणी बायकांना घेऊन ती लेखकाकडे गेली आणि आम्हांला तूच लिहाय - वाचायला शिकव असे हक्काने म्हणाली. पुढच्या पंधरा दिवसात उत्साहाने लिहायला - वाचायला शिकून आजी दुसऱ्यांना पण शिकवू लागली. गावातला एक मुलगा पहिल्यांदा पोलिस झाला, तेव्हा गावातल्या बायका गोळा करुन तिने ड्रेसवरच त्याला ओवाळले. दही - साखरेने तोंड गोड केले. सारे गावकरी तिच्यासाठी तिचे जवळचे नातेवाईकच होते. त्यामुळेच सगळ्यांना तिच्याविषयी मनात आदर होता. म्हणून जेव्हा सखू आजी मरण पावली तेव्हा लहान पोरांपासून म्हाताऱ्याकोताऱ्यांपर्यंत प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी आले होते.

**प्र.१ ब) खालील दिलेल्या उताऱ्यावरून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** (०८)

**अ) आकृती पूर्ण करा.**

१) 

(२)

**उत्तर :** १) सिटियस, ऑल्टियस, फॉर्टियस. २) गतिमानता ३) उच्चता ४) तेजस्विता

२) **चौकट पूर्ण करा.** (२)

वर्तुळाचे पाच रंग

**उत्तर :** १) लाल २) पिवळा (३) निळा (४) काळा (५) हिरवा

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा :** (२)

**१) ऑलिंपिक सामन्यात सहभागी होणाऱ्या खेळाडूंची संख्या.**

**उत्तर :** ऑलिंपिक सामन्यात सहभागी होणाऱ्या खेळाडूंची संख्या पाच ते सहा हजार आहे.

**२) ऑलिंपिक ध्वजाचा व वर्तुळाचा कोणता अर्थ सांगितला आहे?**

**उत्तर :** ऑलिंपिक ध्वजाचा व वर्तुळाचा पाच वर्तुळे म्हणजे जगातील पाच खंड व शुभ्रधवल पार्श्वभूमी म्हणजे विशाल अंतराळ असा अर्थ सांगितला आहे.

**क) खेळ महत्वाचा का आहे ?** (२)

**उत्तर :** 'क्रीडा ' व्यक्तीविकासांचे महत्वाचे साधन आहे. खेळ खेळल्याने व्यक्ती चपळ, सुदृढ व प्रवीण बनते. मैदानी खेळ जसे की, क्रिकेट, बॉस्केट बॉल, हॉक़ी वा कबड्डी अशा प्रकारचे विविध खेळ खेळल्याने मनुष्याचे शरीर लवचिक बनते. खेळ खेळल्याने एक प्रकारची शक्ती अंगात निर्माण होते. व्यक्तीमध्ये वक्तशीरपणा येतो. एकतेचे महत्व कळते. एखाद्या खेळात चांगल्या प्रकारचे प्राविण्य व कौशल्य मिळविल्यास प्रसिध्दी मिळते. खेळ खेळणे म्हणजे एक प्रकारची कसरतच असते, त्यामुळे शरीराचा नियमितपणे व्यायाम होत असतो. खेळामुळे व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक क्रियांचे संतुलन राखले जाते. म्हणून मनुष्याच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासात क्रीडेचे महत्व अनन्यसाधारण असते.

**प्र.१ क) खालील दिलेल्या उताऱ्यावरुन खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** (०८)

**अ) आकृतीबंध पूर्ण करा.** (२)

**(१) छापखान्यातील दोन जर्मन तज्ज्ञ**

(१) ______ (२) ______

**उत्तर :** १) स्लायसर २) गेहर्ट

**(२) रंगशाळेत रविवर्म्यांकडे स्वामींकडे ही भावना व इच्छा व्यक्त केली -** (२)

**उत्तर :** (१) माझ्या सुदैवाने रंगशाळेला आपला लाभ झाला आहे.

(२) आपली आज्ञा असेल तर आपले चित्र काढण्याची अनुमती मिळावी.

**ब) साखळी पूर्ण करा :** (२)

**(१)** रंगशाळेतल्या चित्रसोपानावर हा होता → ______

**उत्तर :** कोरा फलक.

**(२)** स्वामीजींनी रविवर्म्याला हा आशीर्वाद दिला → ______

**उत्तर :** विजयी भव !

**क) पुढील वाक्प्रचारांचा योग्य अर्थ निवडा :** (१)

**उत्तर:** **(१)** बारकाईने बघणे □ **लक्षपूर्वक पाहणे.**

**(२)** निरोप घेणे □ **जाणे.**

**ड) पुढील शब्दसमूहांबद्दल एक शब्द लिहा :** (१)

(१) सतत हसरा चेहऱ्याचा - ______

(२) विदेशाशी जोडलेले - ______

**उत्तर :** (१) हसतमुख (२) विदेशी / परदेशी

**प्र.२ अ) खालील दिलेल्या कवितेनुसार प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(१०)**

**अ) आकृती पूर्ण करा.**

१) (२)




**उत्तर :** १) ज्ञानेश्वर  २) नामदेव  ३) एकनाथ / जनार्दन  ४) तुकाराम

२) (२)




**उत्तर :** १) ओव्या  २) श्लोक  ३) आरत्या  ४) अभंग

**ब) संकल्पना स्पष्ट करा.** (२)

१) पाया रचणे - ☐  २) कळस चढ़वणे ☐

**उत्तर :** १) वारकरी संप्रदायाची स्थापना  २) परिपूर्ण वैभवापर्यंत पोहचवला.

**क) कवितेतील समानार्थी शब्द शोधा.** (१)

**१) झेंडा  २) परिसर**

**उत्तर :** १) ध्वज  २) आवार

**ड) एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)

**इमारत कशाला म्हटले आहे?**

**उत्तर :** इमारत वारकरी संप्रदायांना म्हटले आहे.

**इ) भावार्थ लिहा.** 'ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया।। (२)

**उत्तर :** या वारकरी संप्रदायरुपी इमारतीचा पाया ज्ञानेश्वरांनी रचिला. आपल्या ज्ञान व भक्ती यांच्या जोरावर 'ज्ञानेश्वरांनी ' या इमारतीचा पाया उभा केला. वारकरी संप्रदायाची स्थापना केली. त्यामुळेच आज शेकडो वर्षे झाली तरी हा वारकरी संप्रदाय दिवसेंदिवस वाढ़तच आहे.

**प्र.२ ब) खालील पैकी कोणत्याही एका कवितेचा खालील दिलेल्या मुद्यांच्या आधारे रसग्रहण करा.** **(१०)**

१) भेटीलागी जीवा  २) व्यायामाचे महत्व

१) कवीचे नाम (१)
२) कवीचा जन्म (१)
३) कवितेची प्रस्तावना (१)
४) कवितेतील आवडलेली ओळ व भावार्थ (२)
५) कवितेतून मिळणारा संदेश (२)
६) कवीच्या दोन रचना (१)
७) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे (२)

**उत्तर : १) भेटीलागी जीवा**

(१) संत तुकाराम
(२) १६०८
(३) आपल्या मनातील विठ्ठलाच्या भेटीची ओढ
(४) भुकेलिया बाल अति शोक करी - लहान मुल बोलत नाही. आपल्या सुचना रडण्यातून व्यक्त करते. त्याला भुक लागली असता तो रडतो. आईची वाट पहातो व आईला पाहिल्यावर शांत होतो. त्याप्रमाणे संत तुकारामंना विठ्ठल दर्शनाची भुक, तहान लागली आहे. त्यांचे मन विठ्ठल माऊलीच्या दर्शनासाठी शोक करीत आहे.

(५) भक्ती भावनेची ओढ़
(६) व्यवहार आणि अध्यात्म
(७) अभंग, विरणी
(८) उत्कृष्ट उदाहरणाने विचार प्रदर्शन.

**२) व्यायामाचे महत्व**

१) संत तुकडोजी महाराज माणिक बंडोजी ठाकूर

(२) १९०९

(३) व्यायामाचे महत्व

(४) व्यायामे वाढे प्रतिकार शक्ती / स्वावलंबनाची प्रवृत्ती - आज सर्वत्र प्रदुषण वाढले आहे. माणसाचे आरोग्य धोक्यात येत आहे. अशावेळी जर प्रतिकार शक्ती वाढली तर आपले आरोग्य नीट रहाते. व त्यामध्ये स्वावलंबनाची प्रवृत्ती वाढीस लागते.

(५) स्वास्थ शरीरासाठी व्यायाम महत्वाचा आहे.

(६) १) अनुभवसागर २) भजनावली.

(७) विद्यार्थ्यांमध्ये व्यायामाची आवड निर्माण करणे.

**प्र.३ खालील पैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा. (०६)**

**अ) टिपा लिहा. (कोणतेही एक)**

१) एकशिंगी गेंडा २) गायबगळे

**उत्तर : १) एकशिंगी गेंडा :** आसामचे वैशिष्ट्य दाखविणारा खास प्राणी म्हणजे एकशिंगी गेंडा होय. काझीरंगा अभयारण्यात तो आढळतो. झगातील प्रचंडकाय प्राण्यांत भारतातील एकशिंगी गेंड्याचा चौथा नंबर लागतो. साधारणतः असा समज आहे की, गेंडा हत्तीच्या अंगावर चालून जातो, पण शेजाऱ्याला निष्कारण त्रास देणे त्याच्या रक्तातच नसते. पण क्वचित एकटेपणाने वैतागलेला गेंडा समोर येणाऱ्या पशूवर आक्रमण करायला निघतो. असा एकशिंगी गेंडा प्रत्यक्ष पाहण्यासाठी लेखक काझीरंगाला गेला होता. इथे फिरत असताना थोड्याच वेळात लेखकाला जवळच चिलखत घालून पहाऱ्यावर उभ्या असलेल्या एखाद्या विशालकाय योध्दासारखा पण निश्चल उभा असलेला एकशिंगी गेंडा दिसला.

**२) गायबगळे :** वैजंयती हत्तीणीवर बसून लेखक जंगल सफारी करत होता. त्यावेळी उंचच उंच गवतामधून पाच - पंधरा म्हशींचा कळप शांतपणे चरताना त्याला दिसला. म्हशी गवतातून चालतात त्यावेळी गवतातले अनेक लहान कीटक घाबरुन हवेत उडतात. त्यांना खाण्यासाठी गायबगळे नेहमीच म्हशींच्या जवळ अथवा त्यांच्या पाठीवरती येऊन बसतात. विशाल शिंगांच्या दहा - पंधरा म्हशींच्या मधून वावरणारे हे बगळे पाहून लेखकाच्या मनात आले की, निसर्गाची ही काळ्यावरची पांढरी लिपी केव्हातरी कागदावर चित्रित केली पाहिजे. म्हणजेच काळ्या रानम्हशींच्या मोठ्या आणि सुंदर शिंगांच्या मधून वावरणारे पांढरे बगळे यांचे सुंदरसे चित्र कधीतरी काढावे असे लेखकाला वाटले.

**ब) 'लहान मुलांची हास्यचित्रे काढणे अवघड आहे ' याबाबत तुमचे मत लिहा.**

**उत्तर :** लहान मुले निरागस असतात. त्यांच्या सवयी व आवडीनिवडी यांचे बारकाईने निरीक्षण करणे चित्रकाराला गरजेचे आहे. लहान मुलांचा चेहरा, त्यावरचे भाव व त्यांच्या हालचाली अचूक टिपता यायला हव्यात. शरीराच्या प्रत्येक अवयवाचा आकार शरीराच्या प्रमाणबध्दतेत लहान करावा लागतो. लहान मुलांच्या बारीकसारीक गोष्टींचे सूक्ष्म निरीक्षण करण्याची शक्ती हास्यचित्रकाराला अवगत असायला हवी. लहान मुलांचे मानसशास्त्र पूर्णपणे समजणे ही चित्रकारासाठी पहिली अट आहे. या सर्व कारणांमुळे लहान मुलांची हास्यचित्रे काढणे अवघड असते, असे मलाही वाटते.

**क) व्यंगचित्राची वैशिष्ट्ये लिहा.**

**उत्तर :** १) हास्यचित्राचा पुढला टप्पा म्हणजे व्यंगचित्र होय.

२) व्यंगचित्रे आपल्याला हसवतात, पण केवळ हसवणं एवढाच त्यांचा हेतू नसतो.

३) व्यंगचित्र पाहिल्यावर आपल्याला हसूही येतं आणि ते आपल्याला त्याशिवाय काहीतरी सांगू पाहत असतं.

४) आपण जर अशा व्यंगचित्रापाशी थोडं थांबून राहिलो तर त्यात मांडलेला गमतीदार विचार आपल्या लक्षात येतो.

**प्र.४ अ) व्याकरण विभाग :** (२०)

**१) सूचनेप्रमाणे लिहा.**

**१)** समासाचा विग्रह करुन समासाचा प्रकार ओळखा. (४)

(१) बरेवाईट (२) पाचपंधरा (३) म्हातारेकोतारे (४) मातापिता

**उत्तर : १) बरेवाईट** - बरे किंवा वाईट - वैकल्पिक द्वंद्व समास

**२) पाचपंधरा** - पाच किंवा पंधरा - वैकल्पिक द्वंद्व समास

**३) म्हातारेकोतारे** - म्हातारे, कोतारे इत्यादी - समाहार द्वंद्व समास

**४) मातापिता** - माता आणि पिता - इतरेतर द्वंद्व समास

**२) अलंकार.** (२)

**१) विमान पक्ष्यासारखे गगनात गरगर फिरते.**

**उत्तर : विमान** - उपमेय, **पक्ष्या** - उपमान, **सारखे** - साम्यवाचक, **गरगर** - समानधर्म

**२) मेघासारखा तो श्याम सावळा**

(उपमेय, उपमान, समानधर्म, साम्यवाचक शब्द ओळखा)

**उत्तर : श्याम** - उपमेय, **मेघ** - उपमान, **सावळा** - समानधर्म, **सारखा** - साम्यवाचक

**३) अलंकार ओळखा.** (२)

**१)** आंबा जणू काही साखरच वाटते.

**उत्तर :** उत्प्रेक्षा अलंकार

**२)** नदीचे पाणी दूधासमान शुभ्र दिसते.

**उत्तर :** उपमा अलंकार

**४) योग्य विरामचिन्हे घालून पुढील वाक्य पुन्हा लिहा.** (२)

**१) कोणी सहज म्हटलं आजी कुठं चाललीस**

**उत्तर :** कोणी सहज म्हटलं , "आजी कुठं चाललीस ?"

**२) अरे तुझा पत्ता तरी काय**

**उत्तर :** "अरे , तुझा पत्ता तरी काय ?"

**ब) व्याकरण विभाग :** (२)

**१)**

**उत्तर :**

| अ.क्र. | शब्द | मूळ शब्द | शब्दजात | लिंग | वचन | विभक्ती | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | पुरुषांसाठी | पुरुष | शब्दयोगी | पुल्लिंग | अनेकवचन | - | अव्यय |
| २) | होतात | होणे | क्रियापद | नपुसकलिंग | अनेकवचन | त (सप्तमी) | विकारी |

**२)** आजी माझ्या जवळची होती. **(अधोरेखित शब्दाचा विरुध्दार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा.)** (१)

**उत्तर : जवळची** - क्रियाविशेषण.

**३)** याबाबत मला काहीही म्हणायचे नाही. **(काळ ओळखा)** (१)

**उत्तर :** वर्तमानकाळ.

**४)** पोरके होणे . **(योग्य अर्थाचा पर्याय निवडा)** (१)

**१)** अनाथ होणे **(२)** परकेपणा येणे **(३)** परदेशी जाणे

**उत्तर : पोरके होणे** - अनाथ होणे.

**५) अचूक शब्द ओळखा.** (१)

१) अस्तीत्व, अस्तित्व, अस्त्तिव, अस्तीत्व

**उत्तर :** अस्तित्व

६) **शब्दसमूहासाठी योग्य शब्द लिहा.** (१)

पूर्वीच्या रुढ झालेल्या सुरसकथा

**उत्तर : दंतकथा**

७) **चार अर्थपूर्ण शब्द लिहा.** (१)

सरपंच

**उत्तर :** सर, पंच, रस, संप

८) **सामासिक शब्द तयार करा.** (१)

सूर्याचा उदय - [ ]

**उत्तर : सूर्याचा उदय** - सुर्योदय.

९) **समानार्थी लिहा.** (१)

१) रिवाज २) प्रखर

**उत्तर : १) रिवाज** - रित **२) प्रखर** - तेजस्वी

**प्र.५ अ) पुढील कृती सोडवा.** (१५)

**१) पत्र लेखन:- खालील जाहिरात वाचा आणि सूचनेनुसार पत्रलेखन करा.** (५)

**विज्ञान प्रयोगशाळेतील साहित्य व उपकरणांसाठी**
**एकच विश्वसनीय नाव**
**बिटल सायंटिफिक कंपनी**

- उत्तम दर्जा
- वाजवी दर
- १९६० पासून प्रसिध्द

अधिक माहितीसाठी लॉग इन करा : www. bitelsc. in
संपर्क : बिटल सायंटिफिक कंपनी, महाल, नागपूर - ४४००३२
भ्रमण ध्वनी : ९८९८२४५२३१

तुमच्या शाळेच्या प्रयोगशाळेसाठी साहित्य मागवणारे पत्र कंपनीला लिहा.

**किंवा**

तुमच्या शाळेच्या कंपनीकडून मागवलेल्या साहित्यातील त्रुटीविषयी तक्रार करणारे पत्र लिहा.

**उत्तर : १) मागणी पत्र**

कु. प्रीती देशपांडे
विद्यार्थी प्रतिनिधी,
सावित्रीबाई हायस्कूल,
नागपूर - ४४०००१
दि. २७ डिसेंबर २०१५

प्रति,
मा. विनोद गावडे
व्यवस्थापक,
बिटेल सायंटिफिक कंपनी
महाल, नागपूर - ४४०००३२.

**विषय : प्रयोगशाळेतील साहित्याच्या मागणीबाबत.**

माननीय महोदय,

मी प्रीती देशपांडे (वर्ग १० वी), नागपूर येथील सावित्रीबाई हायस्कूल या शाळेची विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. दि. १५ डिसेंबर २०१५ रोजी वर्तमानपत्रात शालेय प्रयोगशाळेतील साहित्यांसंदर्भातील आपली जाहिरात वाचली.

यावर्षी आमचे शैक्षणिक पत्र दि. १ जुलै २०१६ पासून सुरु होत आहे. आमच्या शाळेला काही उपकरणांची गरज आहे. आपल्या संकेतस्थळावील साहित्याची यादी व दर आम्ही पाहिली. शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार पुढील उपकरणे प्रयोगशाळेसाठी मागवत आहे. योग्य ती सवलत आपण द्याल असा विश्वास वाटतो. तसेच या पत्रासोबत १२,५५३/- रुपयांचा डिमांड ड्राफ्ट देखील पाठवत आहे.

**उपकरणांची यादी.**

| उपकरणाचे नाव | संख्या |
|---|---|
| परीक्षानळी | २५ |
| चंचुपात्र | २५ |
| ॲमीटर | ५ |
| सूक्ष्मदर्शक | ३ |

हे पत्र मिळताच सर्व साहित्य पाठविण्याची व्यवस्था करावी ही नम्र विनंती.
कळावे,

आपली विश्वासू,
प्रीती देशपांडे

तिकीट

प्रति,
मा. विनोद गावडे
व्यवस्थापक,
बिटेल सायटिफिक कंपनी, महाल,
नागपूर - ४४००३२.

प्रेषक :
कु. प्रीती देशपांडे
विद्यार्थी प्रतिनिधी,
सावित्रीबाई हायस्कूल,
नागपूर - ४४०००१.

**उत्तर : २) तक्रार पत्र**

कु. प्रीती देशपांडे
विद्यार्थी प्रतिनिधी,
सावित्रीबाई हायस्कूल,
नागपूर - ४४०००१.
दि. २७ जानेवारी २०१६.

प्रति,
मा. विनोद गावडे
व्यवस्थापक,
बिटल सायंटिफिक कंपनी
महाल, नागपूर - ४४००३२.

**विषय : प्रयोगशाळेतील साहित्याबाबत तक्रार**

माननीय महोदय,

मी प्रीती देशपांडे (वर्ग १० वी), नागपूर येथील सावित्रीबाई हायस्कूल या शाळेची विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. दि. २७ डिसेंबर २०१५ रोजी पाठविलेल्या पत्रात नमूद केलेले साहित्य मिऴाले. मात्र सखेद नमूद करावेसे वाटते, की आपण पाठवलेल्या उपकरणांमध्ये अनेक त्रुटी आहेत.

२५ परीक्षानळ्यांपैकी ५ नळ्या या फुटक्या अवस्थेत मिळाल्या. सर्व चंचुपात्रेदेखील आम्हाला अपेक्षित दर्जाची नाहीत. ५ पैकी ३ ॲमीटर सर्व प्रयत्न करुन देखील सुरु झाले नाहीत.

याबाबत वारंवार तक्रार करुन देखील आपल्या कंपनीतील संबंधितांनी त्याची दखल घेतली नाही. तेव्हा या प्रकरणात आपण वैयक्तिकरीत्या लक्ष घालून लवकरात लवकर कार्यवाही करावी आणि दोषपूर्ण उपकरणे बदलून द्यावीत, ही नम्र विनंती.

कळावे,

आपली विश्वासू,
प्रीती देशपांडे

तिकीट

प्रति,
मा. विनोद गावडे
व्यवस्थापक,
बिटल सायंटिफिक कंपनी, महाल,
नागपूर - ४४००३२.

प्रेषक :
कु. प्रीती देशपांडे
विद्यार्थी प्रतिनिधी, सावित्रीबाई हायस्कूल,
नागपूर - ४४०००१

**२) कथा लेखन:-** (५)

**मुद्दे :** कोल्हा व करकोचा मैत्री - कोल्हयाने करकोच्याला जेवायला बोलावणे - उथळ थाळीत खीर देणे - करकोच्याला खीर खातर न येणे - करकोचा उपाशी - करकोच्याने कोल्हयाला जेवायला बोलावणे - सुरईत खीर देणे - कोल्हा उपाशी - तात्पर्य.

**जशास तसे**

एका नदीवर कोल्ह्याला भेटला एक करकोचा. पुढे त्यांची मैत्री जमली. एकदा कोल्ह्याला वाटले, करकोच्याशी जरा गंमत करावी, त्याने करकोच्याला जेवायला बोलवले.

करकोचा कोल्ह्याच्या घरी जेवायला गेला. कोल्ह्याने केली होती खीर. त्याने खीर वाढली सपाट ताटात. त्याने एक ताट करकोच्यापुढे व दुसरे आपल्यापुढे घेतले. कोल्हा म्हणाला, "मित्रा, कर सुरुवात खायला!" पण करकोच्याला खाली वाकून ताटातली खीर काही खाता येईना. कोल्ह्याने मात्र सगळी खीर खाल्ली. करकोच्याला फार राग आला. पण तो गप्प बसला. त्याने त्या लबाड कोल्ह्याची खोड मोडायचे ठरवले.

पुढे काही दिवसांनी करकोच्याने कोल्ह्याला जेवायला बोलावले. कोल्हा करकोच्याच्या घरी गेला. करकोच्याने खीर वाढली सुरईत. एक सुरई ठेवली कोल्ह्यापुढे व एक सुरई आपल्यापुढे घेतली. कारकोचा म्हणाला, "हं! कोल्होबा, करा सुरुवात. तुम्हाला खीर फार आवडते. म्हणून मुद्दाम केली आहे. लाजू नका. खा, पोटभर."

करकोचा लांब चोच सुरईत घालून खीर खात होता. पण कोल्ह्याला मात्र सुरईतली खीत खाता येईना. तो शरमेने खाली मान घालून निघून गेला.

**तात्पर्य** - जगात शेराल सव्वाशेर हा भेटतोच.

**३) आकलन लेखन:-** (५)

**खालील उतारा वाचून त्यावर पाच प्रश्न असे तयार करा की ज्याची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात येतील.**

ईश्वर आणि माणूस यांचे नाते माय - लेकरांसारखे असते. आई कधी आपल्या मुलाला उपाशी ठेवून स्वत: तूप - रोटी खाईल का? देवालादेखील आपला भक्त उपाशी असताना तूप कसे गोड लागेल? खरेतर ईश्वराला तूप, नैवेद्य, पूजा - अर्चा या अवडंबराची अजिबात गरज नसते. तो फक्त भावाचा भुकेला असतो. असे असताना भारतासारख्या गरीब देशात, जिथे लाखो लोकांना पोटाला अन्न मिळत नाही, तिथे देवाधर्मावर, उत्सवांवर चालणारी वारेमाप उधळपट्टी कितपत योग्य आहे?

आदिवासी भागात दरवर्षी हजारो मुले कुपोषणाने तडफडून मरत असताना आपण देवभक्तीने अवडंबर माजवत हजारो लिटर दूध अभिषेकापायी वाया घालवणे तुमच्या मनाला कितपत मानवते?

- साने गुरुजी

**उत्तरे :**

**प्रश्न :** १) ईश्वर आणि माणूस यांचे नाते कोणासारखे असते ?

२) ईश्वराच्या कोणत्या अवडंबराची गरज नसते?

३) भारत देशात कोणावर उधळपट्टी चालते?

४) आदिवासी भागात दरवर्षी मुले का मरतात?

५) आपण देवभक्तीचे अवडंबर माजवताना काय व कशापायी वाया घालवतो?

**प्र.५ ब) खालील पैकी कोणतेही दोन कृती सोडवा.** (१०)

**१) जाहिरात लेखन :- पुढील जाहिरात पाहून त्याखालील कृती करा.** (५)

**निशिगंध**

**टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स**

निशिगंधसह पाहा भारत, ते ही परवडणाऱ्या दरात !

**पॅकेज टूर्स**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| नैनीताल कौसानी मसुरी | शिमला कुलू मनाली | अमृतसर मनाली | गंगटोक सिक्कीम | केरळ | राजस्थान |

- उत्तम नियोजित सहली
- पूर्णवेळ मार्गदर्शक
- ३ तारांकित हॉटेल्समध्ये निवास
- ट्रॅव्हल्सतर्फे पूर्णवेळ शेफ

संपर्क : ०२२ - ५१३२०१७/१८/१९

२ दिवसांत नोंदणी केल्यास २५% पर्यंत सूट !

**१) आकृतिबंध पूर्ण करा.** (२)




**उत्तर :** १) नैनीताल - कौसानी - मसुरी

२) शिमला - कुलू - मनाली

३) अमृतसर - काश्मीर

४) गंगटोक - सिक्कीम

५) केरळ

६) राजस्थान

**२) आकृतिबंध पूर्ण करा.** (२)




**उत्तर :** १) परवडणारे दर

२) सहलींचे उत्तम नियोजन

३) पूर्णवेळ मार्गदर्शक

४) ३ तारांकित हॉटेल्समध्ये निवास

५) ट्रॅव्हल्सतर्फे पूर्णवेळ शेफ

**३) निशिगंध ट्रॅव्हल्सतर्फे कोणती विशेष सवलत दिली आहे?** (१)

**उत्तर :** जाहिरात प्रकाशित झाल्यापासून दोन दिवसांच्या आत निशिगंध ट्रॅव्हल्सच्या पॅकेज टूर्सची नोंदणी केल्यास प्रवाशांना २५% पर्यंत सूट देण्यात येणार आहे.

२) **संवाद लेखन :-** (५)

**'दहावीची पूर्वतयारी ' या विषयावर विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील संवाद लेखन करा.**

**उत्तर :**

**शिक्षक :** काय सुजाता ? कसे गेले पेपर ?

**सुजाता :** छान गेले पेपर सर. नववीचा शेवटचा पेपर दिला आणि दहावीत गेल्यासारखंच वाटलं.

**शिक्षक :** हो, सर्वांचं असंच होतं. मग आता सुट्टीचा सदुपयोग कसा करणार, काही ठरवलंय का ?

**सुजाता :** हो सर. मी सुट्टीतच दहावीचा अभ्यास सुरु करणार आहे. दोन - तीन दिवसांत पाठ्यपुस्तकं घेईन.

**शिक्षक :** उत्तम. दहावीचा अभ्यास जितका लवकर सुरु करशील तेवढे उत्तम. तुला कोणते विषय कठीण वाटतात ?

**सुजाता :** मला गणित, इंग्रजी आणि विज्ञान हे तीन विषय कठीण वाटतात.

**शिक्षक :** बरं. मग आतापासूनच या तील विषयांचा अभ्यास सुरु कर. गणितातली प्रमये समजून घे. या तिन्ही विषयांचे सुरुवातीचे पाठ फारसे कठीण नाहीत. तेव्हा लगेच अभ्यास सुरु कर.

**सुजाता :**हो सर नक्कीच. सोबतच मराठी, हिंदी, इतिहास या माझ्या आवडत्या विषयांचं वाचनही सुरु करणार आहे.

**शिक्षक :** अरे वा ! छान. आता नववीच्या निकालाचा विचार सोड आणि जोमाने दहावीच्या पूर्वतयारीला लाग. काही अडलं तर विचार.

**सुजाता :** धन्यावाद सर.

३) **वृत्तांत लेखन :-** (५)

**तुमच्या विद्यालयात साजऱ्या केलेल्या खालील विनविशेषाचा वृत्तांत लिहा.**

शिक्षकदिन समारोह
दि. ५ सप्टेंबर
लाल बहादुर शास्त्री विद्यालय, परळ
मार्गदर्शन : मुख्याध्यापिका
सौ. आचरेकर मॅडम



**उत्तर :**

**मुंबई - ५ सप्टेंबर :** परळ येथील लाल बहादूर शास्त्री विद्यालयात काल'शिक्षक दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. आचरेकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत शिक्षक दिनाचे औचित्य साधून विविध आकर्षक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळपासूनच मुलांचा आनंद ओसंडून वाहत होता. विशेषतः दहावीच्या विद्यार्थ्यांचा आनंद मात्र वेगळा होता. कारण त्यांनीच आज शाळा चालविली. काही विद्यार्थी - विद्यार्थीनी शाळेतील शिक्षक बनून वर्गामध्ये शिकविण्यासाठी गेले होते. दोन विद्यार्थ्यांनी वर्गामध्ये नोटीस नेऊन देण्याचे व घंटा वाजवण्याचे शिपायाचे कामदेखील केले. एरवी अरे, तुरे करणारे इतर विद्यार्थी मात्र आपल्याच शिक्षक बनलेल्या विद्यार्थी मित्रांना अहो, जाहो करताना दिसत होते. शाळा सुटल्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका, सौ. आचरेकर मॅडम व इतर शिक्षकांनी शिक्षक बनलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी आपले विविध अनुभव शिक्षकांना सांगितले. चहापानानंतर या कार्यक्रमाची सांगता झाली.

प्र.५ क) **निबंध लेखन :- (कोणतेही एक)** (०५)

**१) माझे आवडते शिक्षक**

विद्यार्थी दशेत आपल्याला अनेक शिक्षकांचे मार्गदर्शन लाभते. त्यांनी दिलेल्या ज्ञानाच्या शिदोरीवर आपण पुढील आयुष्यात उत्तम प्रगती करतो. सर्वच शिक्षकांबद्दल मनात आदराची भावना असते. मी माध्यमिक शाळेत असताना शाळेच्या पहिल्या दिवशी एक मध्यम उंचीचे, गोरे, डोळ्यांवर सोनेरी काड्यांचा चश्मा, हसतमुख असे शिक्षक आमच्या नववीच्या वर्गात आले. त्यांनी आपली ओळख करुन दिली. श्री. मकरंद हळदणकर तेच आमचे वर्गशिक्षक होते.

हळदणकर सर आम्हाला मराठी विषय शिकवायचे. त्यांची शिकवण्याची हातोटी फारच उत्तम होती. अवघड पाठ, कविता, व्याकरण ते इतके सोपे करुन शिकवत की वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना मराठी विषय आवडू लागला. सोपा वाटू लागला.

सरांचे मराठी या विषयावर प्रभुत्व होते. त्यांचे वाचनही चौफेर व अफाट होते. हे ते बोलायला लागल्यावर ताबडतोब जाणवत असे. कोणताही पाठ शिकवताना ते त्या लेखकाची माहिती तर देत, पण अनेक सुंदर दाखले, त्या लेखकाची उत्तम पुस्तके यांचीही माहिती देत.

विद्यार्थ्यांनी उत्तमोत्तम पुस्तके वाचली पाहिजेत अरे त्यांचे मत होते. श्रीमान योगी, श्यामची आई, आय डेअर, अग्नीपंख अशी अनेक पुस्तके मी त्यांच्याच सांगण्यावरुन वाचली. नंतर मला वाचनाचे वेडच लागले. बघता बघता माझी आणि सरांची छान दोस्ती झाली. ते माझे अतिशय आवडते शिक्षक झाले.

सरांचे हस्ताक्षरही फारच सुंदर होते. सर्व विद्यार्थ्यांचे अक्षर वळणदार व्हावे, असे सरांना वाटे आणि त्यासाठी ते मुलांना मार्गदर्शन करीत. सर उत्तम कविताही करीत असत. वर्तमानपत्र त्यांचे विविध विषयांवरचे लेख लिहून येत.

शाळेत कोणताही कार्यक्रम असला की, सर फारच सुंदर निवेदन करीत. मला नेहमी बरोबर घेत व उत्तम निवेदन कसे करायचे ते तंत्र समजून देत. माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांच्या मनातील भीती घालवून सरांनी उत्तम बोलण्यासाठी तयार केले.

वक्तृत्वस्पर्धा, निबंध स्पर्धा, कथाकथन, वादविवाद स्पर्धा अशा स्पर्धांमधून ते मला भाग घ्यायला लावत. स्वतः निबंध लिहून देत. भाषणे तयार करुन देत. त्यामुळे अनेक स्पर्धामध्ये मी व माझ्या मित्रांनी बक्षीसे पटकावली. सरांना बेशिस्तपणा अजिबात आवडत नसायचा. शिकवत असताना गप्पा मारलेल्या खपत नसत. ते कधीही कोणालाही मारत नसत. पण बाजूला घेऊन विद्यार्थ्यांने केलेली चूक त्याला दाखवून देत व परत ती चूक न करण्याची ताकीद देत.

ते स्वतः टापटीप राहत. नेहमी प्रसन्न असत. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे ते अनेक विद्यार्थ्यांचे आवडते होते. मला तर ते सर खूपच आवडत. आजही सर भेटले की आपुलकीने चौकशी करतात. प्रेमाने पाठ थोपटतात. त्यांचा प्रेमळं स्पर्श सुखातून जातो आणि म्हणावेसे वाटते,

"कधीही न पडो त्यांचा विसर, असे लाभले मला प्रेमळ सर"

## २) परीक्षा नसत्या तर ....

"शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा संप
त्यामुळे विद्यापीठाच्या परीक्षा रद्द ."

ही बातमी वाचून हातापायांतील शृंखला गळून गेल्यासारखं वाटलं . मनात आले, खरच, हव्या तरी कशाला या परीक्षा आजचे शैक्षणिक जीवनच या परीक्षारुपी असुराने ग्रासून टाकले आहे.

आजची आपली शिक्षणपध्दती पहा ! बालवाडीपासून पदवीधर होईपर्यंत दरवर्षी परीक्षेच्या अडथळा शर्यतीत भाग घ्यावा लागतो. परीक्षा सात - आठ दिवसांवर आली की, अंग शहारुन येते. परीक्षेची तयारी झाली तरी दडपण येते. परीक्षाजवळ आली की आमच्या खेळावर बंदी येते. जरा कुठे हातात चेंडू घेतला की बाबा गरजतात, "हं, तो चेंडू ठेवा बाजूला आणि गणिते सोडवा नाहीतर सगळे भोपळेच येतील वाट्याला, गणिताचे नाव काढले की अंगाला दरदरुन घाम फुटतो.

खरोखर ही परीक्षा आम्हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील सर्व आनंद शोषून घेत असते. शाळेत जायला सर्वांना आवडते. तिथे आपले समवयस्क सवंगडी नाना खेळ, गाणी, गोष्टी वगैरे असतात. दोन - अडीच वर्षांतच प्रवेश देताना पहिल्यांदा मुलाखत द्यावी लागते. शाळेत तोंडी परीक्षा, चाचणी परीक्षा, सत्रांत परीक्षा अशा परीक्षांना तोंड द्यावे लागते. परीक्षा जवळ आली की आई, वडिलांची सतत कटकट सुरु असते. परीक्षेनंतर चिंतेत टाकणारे महाराक्षस निकाल येतात. तेव्हा आई, वडील, शिक्षक सगळ्यांनाच सामोरे जावे लागते.

हल्लीच्या परीक्षापद्धतीत भर आहे स्मरणशक्तीवर ! विचारशक्ती, कल्पनाशक्ती, सृजनशीलता याचा विचारच फारसा केला जात नाही. प्रत्येकाची आवड, पात्रता पाहून अभ्यासाची निवड नसते. सगळ्यांना एकच धोपटमार्ग, म्हणूनच वाटते परीक्षा नसत्या तर! अब्राहम लिंकन म्हणतात, "शिक्षण म्हणजे माणसाच्या मनोबुद्धीला पूर्णता देण्यासाठी केलेली अखंड धडपड, ज्ञान, पज्ञा, चारित्र्य, संस्कार या गोष्टींकडे विशेष लक्ष परीक्षेत दिले जात नाही. "

परीक्षाच नसतील तर विद्यार्थी ज्ञानार्थी बनेल. पेपर फुटणे, कॉपी करणे, गुण देण्यांतील भ्रष्टाचार व घोटाळे हे सर्व प्रकार थांबतील आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आपले छंद जोपासण्यासाठी मुलांना वेळ मिळेल. पण कधीकधी असे वाटते परीक्षा असल्या की यश मिळते व यश मिळाले की शाबासकी मिळते. या शाबासकी पासून आम्हाला वंचित रहावे लागेल. हे जीवनच परीक्षा आहे मग शालेय परीक्षांपासून का बरे पळावे ? असा विचार शेवटी मनात येऊन जातो.

*** BEST OF LUCK ***